ePaper

शेतकऱ्यांची कर्जमाफी होणार, मुख्यमंत्री घोषणा करणार!

| वर्ष - 9 । अंक - 4 | UDYAM-MH-26-0158827 |



महाईन्यूज ™

आतील पानांत

- कोणत्या जागेसाठी कोण दावेदार?
- नामांकित खेळाडूंच्या सहभागाचे आकर्षण
- जर तुम्ही तुमचं काम केलं नाही तर..!
- शुक्ला यांच्या मोहिमेचा सर्वांना अभिमान

www.mahaenews.com । मंगळवार, दि. 19 ऑगस्ट 2025 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## अतिवृष्टी

## मुंबई आणि उपनगरांमध्ये अतिमुसळधार पाऊस सुरू

# महाराष्ट्रावर तिहेरी संकट!

## पुढील 24 तास धोक्याचे; मुंबई, ठाणे, पालघर, रायगड जिल्ह्यांना रेड अलर्ट



। मुंबई / मालेगाव ।
प्रतिनिधी । महाईन्यूज

**महाराष्ट्रात पावसाने अक्षरशः धुमाकूळ घातला असून कोकण, मराठवाडा आणि पश्चिम महाराष्ट्रात अतिवृष्टीमुळे शेती व जनजीवन विस्कळीत झाले आहे. मुंबईसह उपनगरांत मुसळधार पावसाने चाकरमान्यांची तारांबळ उडवली आहे. हवामान विभागाने पुढील 48 तासांसाठी मुसळधार ते अतिमुसळधार पावसाचा अंदाज वर्तवला असून मुंबई, ठाणे, पालघर व रायगड जिल्ह्यांसाठी रेड अलर्ट जारी केला आहे.**

दरम्यान, वादळ, विजांचा कडकडाट आणि जोरदार पाऊस या तिहेरी संकटाचा इशारा देण्यात आला आहे. कोकण किनारपट्टीवर 50-60 किमी वेगाने वारे वाहणार असून, मच्छिमारांना खोल समुद्रात न जाण्याचे आदेश दिले आहेत.

मुंबईत मलबार हिल परिसरात भिंत कोसळून एका सुरक्षा रक्षकाचा मृत्यू झाला आहे. रस्त्यांवर पाणी साचल्याने वाहतूक ठप्प झाली असून, प्रशासनाने शाळांना सुट्टी जाहीर केली आहे. मात्र ग्रामीण भागातील शाळांविषयी निर्णय स्थानिक अधिकाऱ्यांवर सोपविण्यात आला आहे.

मराठवाड्यात पूरस्थिती गंभीर असून नांदेड, बीड व हिंगोली जिल्ह्यांत आतापर्यंत सहा जणांचा मृत्यू झाला आहे. छत्रपती संभाजीनगरसह नांदेड जिल्ह्यात एनडीआरएफ, एसडीआरएफसोबत सैन्यदलही बचावकार्यात उतरले आहे. लाखो हेक्टरवरील सोयाबीन व कापूस पाण्याखाली गेल्याने शेतकरी हवालदिल झाले आहेत.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व मंत्री नितेश राणे यांनी नागरिकांना सतर्कतेचं आवाहन करताना, गरज असेल तरच घराबाहेर पडावं, असे स्पष्ट केले आहे.

### सुरक्षा रक्षकाचा मृत्यू

पावसामुळे मोठं नुकसान झालं आहे, मुंबईच्या मलबार हिल परिसरात पावसामुळे भिंत कोसळली, या घटनेत एका सुरक्षा रक्षकाचा मृत्यू झाला आहे. सतीश शिर्के असं या 35 वर्षिय सुरक्षा रक्षकाचं नाव आहे. शिर्के हे या घटनेत गंभीर जाखमी झाले होते, त्यांना उपचारासाठी रुग्णालयात नेण्यात आले, मात्र डॉक्टरांनी त्यांना तपासून मृत घोषीत केलं. मुंबईत पुढील 48 तासांसाठी रेड अलर्ट जारी करण्यात आला आहे. तर पुढच्या 12 तासांत मुंबईत पावसाचा जोर वाढणार आहे. हीच बाब लक्षात घेऊन प्रशासनाने येथील शाळांना सुट्टी जाहीर केली आहे. या निर्णयानंतर आता गावखेड्यातील शाळांचं काय होणार? या शाळा चालूच राहणार का? असे विचारले जात आहे.

सध्या मुंबई, कोकणासह संपूर्ण राज्यात पावसाने थैमान घातले आहे. मराठवाड्यात तर लाखो हेक्टरवरील पिकांचे नुकसान झाले आहे. सोयाबीन, कापूस यासारखी पिके पाण्याखाली गेली आहेत. मुंबईतही रस्ते पाण्याने तुडुंब भरलेले आहेत. हीच बाब लक्षात घेताना अनेक जिल्ह्यांत शाळांना सुट्टी देण्यात आली आहे. सध्या मुंबई, कोकणासह संपूर्ण राज्यात पावसाने थैमान घातले आहे. मराठवाड्यात तर लाखो हेक्टरवरील पिकांचे नुकसान झाले आहे. सोयाबीन, कापूस यासारखी पिके पाण्याखाली गेली आहेत. मुंबईतही रस्ते पाण्याने तुडुंब भरलेले आहेत. हीच बाब लक्षात घेताना अनेक जिल्ह्यांत शाळांना सुट्टी देण्यात आली आहे.

मुंबईत पुढील 48 तासांसाठी रेड अलर्ट जारी करण्यात आला आहे. तर पुढच्या 12 तासांत मुंबईत पावसाचा जोर वाढणार आहे. हीच बाब लक्षात घेऊन प्रशासनाने येथील शाळांना सुट्टी जाहीर केली आहे. या निर्णयानंतर आता गावखेड्यातील शाळांचं काय होणार? या शाळा चालूच राहणार का? असे विचारले जात आहे. मुंबईत पुढील 48 तासांसाठी रेड अलर्ट जारी करण्यात आला आहे. तर पुढच्या 12 तासांत मुंबईत पावसाचा जोर वाढणार आहे. हीच बाब लक्षात घेऊन प्रशासनाने येथील शाळांना सुट्टी जाहीर केली आहे. या निर्णयानंतर आता गावखेड्यातील शाळांचं काय होणार? या शाळा चालूच राहणार का? असे विचारले जात आहे.

पालक, विद्यार्थ्यांत पसरलेल्या याच संभ्रमामाबत शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी महत्त्वाची माहिती दिली आहे. त्यांनी दिलेल्या माहितीमुळे पाकल तसेच विद्यार्थ्यांमधील संभ्रम दूर झाला आहे.

स्थानिक परिस्थिती पाहून अधिकाऱ्यांनी सुट्टीबाबत निर्णय घ्यावा, असे भुसे यांनी सांगितले आहे. पालक, विद्यार्थ्यांत पसरलेल्या याच संभ्रमामाबत शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी महत्त्वाची माहिती दिली आहे. त्यांनी दिलेल्या माहितीमुळे पाकल तसेच विद्यार्थ्यांमधील संभ्रम दूर झाला आहे. स्थानिक परिस्थिती पाहून अधिकाऱ्यांनी सुट्टीबाबत निर्णय घ्यावा, असे भुसे यांनी सांगितले आहे. स्थानिक परिस्थिती पाहून अधिकाऱ्यांनी तसेच वेळप्रसंगी मुख्याध्यापकांनी शाळांना सुट्टी देण्याबाबत निर्णय घ्यावा, असे दादा भुसे यांनी सांगितले आहे.

आगामी काळात पावसाचा अलर्ट देण्यात आल्यामुळे स्थानिक परिस्थिती लक्षात घेऊन अधिकाऱ्यांनी निर्णय घ्यावेत, असे भुसे यांनी सांगितले आहे. स्थानिक परिस्थिती पाहून अधिकाऱ्यांनी तसेच वेळप्रसंगी मुख्याध्यापकांनी शाळांना सुट्टी देण्याबाबत निर्णय घ्यावा, असे दादा भुसे यांनी सांगितले आहे. आगामी काळात पावसाचा अलर्ट देण्यात आल्यामुळे स्थानिक परिस्थिती लक्षात घेऊन अधिकाऱ्यांनी निर्णय घ्यावेत, असे भुसे यांनी सांगितले आहे.




> संपूर्ण महाराष्ट्राला मुसळधार पावसाने अक्षरश: झोडपून काढले आहे. मराठवाडा, विदर्भ, पश्चिम महाराष्ट्र, कोकण अशा सर्वच भागांत पावसाने जोर धरला आहे. विशेष म्हणजे आगामी काही दिवसांत पाऊस कायम राहणार असून नागरिकांनी काळजी घ्यावी. मुंबईत तर स्थिती यापेक्षाही भयंकर आहे. मुंबईत जागोजागी रस्ते पाण्याने तुंबले आहेत.
>
> **-देवेंद्र फडणवीस, मुख्यमंत्री**

### मराठवाड्यात मिलिटरीला पाचारण

मराठवाड्यातील पावसाच्या स्थितीबाबत विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर यांनी सविस्तर माहिती दिली आहे. त्यांनी दिलेल्या या माहितीनुसार बचावकार्यासाठी मराठवाड्यात एनडीआरएफ एसडीआरएफसोबत मिलिटरीलाही पाचारण करण्यात आले आहे. मिलिटरीचे 20 जवान मतदाकार्यासाठी मराठवाड्यात दाखल झाले आहेत. जितेंद्र पापळकर यांची नुकतीच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासोबत बैठक झाली आहे. या बैठकीत फडणीसांनी पावसाचा आढवा घेतला असून आवश्यक ते सर्व निर्देश दिले आहेत.

पाणीसाठा

## खडकवासला धरणांमध्ये २६.६१ 'टीएमसी' पाणीसाठा...

# जिल्ह्यातील पाच धरणे काठोकाठ!

## भीमा नदीपात्रात विसर्ग सुरू झाला

।पुणे।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**जिल्ह्यातील कळमोडी, चासकमान, वडिवळे, भाटघर आणि नाझरे ही पाच धरणे शंभर टक्के भरली आहेत. भीमा खोऱ्यांतर्गत धरणांच्या पाणलोट क्षेत्रात सुरू असलेल्या पावसामुळे नदीपात्रातील विसर्गामुळे सोलापूर आणि अहिल्यानगर जिल्ह्यासाठी वरदान ठरलेले उजनी धरणही शंभर टक्के भरले आहे. खडकवासला धरण साखळी प्रकल्पातील पाणीसाठ्यातही वाढ होत असल्याने साखळी प्रकल्पातील चारही धरणांमध्ये २६.६१ अब्ज घनफूट एवढा पाणीसाठा जमा झाला असून, धरणे ९१.९७ टक्के भरली आहेत.**



दरम्यान, नीरा आणि भीमा नदीपात्रात विसर्ग सुरू झाला असल्याने नदीकाठच्या रहिवाशांनी सावधानता बाळगावी, असे आवाहन जलसंपदा विभागाकडून करण्यात आले आहे. भीमा खोऱ्यांतर्गत जिल्ह्यात २६ धरणे आहेत. त्यांपैकी भाटघर, चासकमान, वडिवळे, नीरा-देवघर, कळमोडी, आंद्रा या धरणांतून अनुक्रमे नीरा आणि भीमा नदीपात्रात विसर्ग सुरू करण्यात आला आहे. धरणे शंभर टक्के भरल्याने आणि पावसामुळे धरणांच्या पाणलोट क्षेत्रात येवा येण्याचे प्रमाण वाढत असल्याने पाणीसाठा नियंत्रित करण्यासाठी चासकमान धरणातून सोमवारी सायंकाळी साडेसहा वाजता १ हजार ५०० क्युसेक विसर्ग भीमा नदीपात्रात सुरू करण्यात आला आहे. तर भाटघर धरणाच्या विद्युतनिर्मिती केंद्राद्वारे १ हजार ६३१ क्युसेक, धरणाच्या अस्वयंचलित द्वारांद्वारे ७ हजार क्युसेक असा एकूण ८ हजार ६३१ क्युसेक विसर्ग सुरू असल्याची माहिती जलसंपदा विभागाच्या अधिकाऱ्यांनी दिली. पाणलोट क्षेत्रातील पावसाचे प्रमाण आणि येवा यानुसार विसर्ग कमी-अधिक केला जाणार आहे. नीरा-देवधर धरणाच्या सांडव्यातून ९ हजार ५२० क्युसेक वेगाने नीरा नदीपात्रात पाणी सोडण्यात आले. तर, वीर धरणातून २२ हजार ६३५ क्युसेक एवढा विसर्ग सुरू आहे. डिंभे, विसापूर, भामा-आसखेड, पवना, कासारसाई, टेमघर, वरसगाव, पानशेत, नीरा-देवधर, वीर ही धरणे १०० टक्के भरण्याच्या मार्गावर आहेत. शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या खडकवासला, पानशेत, वरसगाव आणि टेमघर धरणांमध्ये २६.८१ टीएमसी एवढा पाणीसाठा झाल्याने पुणेकरांची वर्षभराच्या पाण्याची चिंता मिटली आहे.

### उजनी धरण शंभर टक्के भरले

नीरा-देवधर धरणाच्या सांडव्यातून ९ हजार ५२० क्युसेक वेगाने नीरा नदीपात्रात पाणी सोडण्यात आले. तर, वीर धरणातून २२ हजार ६३५ क्युसेक एवढा विसर्ग सुरू आहे. शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या खडकवासला, पानशेत, वरसगाव आणि टेमघर धरणांमध्ये २६.८१ टीएमसी एवढा पाणीसाठा झाल्याने पुणेकरांची वर्षभराच्या पाण्याची चिंता मिटली आहे.

या चारही धरणांमध्ये मिळून ९१.९७ टक्के पाणीसाठा झाला आहे. पानशेत धरणातून मुठा नदीपात्रात सांडव्याद्वारे १ हजार २४२ क्युसेक आणि विद्युतनिर्मिती केंद्राद्वारे ६०० क्युसेक असा एकूण १ हजार ८४२ क्युसेक विसर्ग सुरू आहे.गेल्या दीड महिन्यापासून या चारही धरणांच्या पाणलोट क्षेत्रात कमी-अधिक प्रमाणात पाऊस होत आहे. सोमवारी सायंकाळी पाच वाजेपर्यंत खडकवासला धरणाच्या पाणलोट क्षेत्रात १६, पानशेत येथे ५९, वरसगाव येथे ५४ आणि टेमघर धरणाच्या पाणलोट क्षेत्रात ४२ मिलिमीटर पावसाची नोंद करण्यात आली.दरम्यान, नीरा आणि भीमा नदीपात्रात विसर्ग सुरू झाला असल्याने नदीकाठच्या रहिवाशांनी सावधानता बाळगावी, असे आवाहन जलसंपदा विभागाकडून करण्यात आले आहे. भीमा खोऱ्यांतर्गत जिल्ह्यात २६ धरणे आहेत. त्यांपैकी भाटघर, चासकमान, वडिवळे, नीरा-देवघर, कळमोडी, आंद्रा या धरणांतून अनुक्रमे नीरा आणि भीमा नदीपात्रात विसर्ग सुरू करण्यात आला आहे. येवा येण्याचे प्रमाण वाढत असल्याने पाणीसाठा नियंत्रित करण्यासाठी चासकमान धरणातून सोमवारी सायंकाळी साडेसहा वाजता १ हजार ५०० क्युसेक विसर्ग भीमा नदीपात्रात सुरू करण्यात आला आहे. तर भाटघर धरणाच्या विद्युतनिर्मिती केंद्राद्वारे १ हजार ६३१ क्युसेक, धरणाच्या अस्वयंचलित द्वारांद्वारे ७ हजार क्युसेक असा एकूण ८ हजार ६३१ क्युसेक विसर्ग सुरू असल्याची माहिती जलसंपदा विभागाच्या अधिकाऱ्यांनी दिली.

# मदतीसाठी पालिकेची ३० पथके तैनात

## 'रेड अलर्ट' जारी केल्याने पालिकेचा आपत्ती व्यवस्थापन कक्ष सतर्क

।पुणे।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**हवामान विभागाने 'रेड अलर्ट' दिल्याने महापालिकेचा आपत्ती व्यवस्थापन कक्ष दक्ष झाला आहे. धरणातून नदीत पाणी सोडल्यास हे पाणी नागरी वस्तीमध्ये घुसू नये, यासाठी आवश्यक ती काळजी घेतली जात आहे. महापालिकेच्या १५ क्षेत्रिय कार्यलयांमध्ये प्रत्येकी दोन पथके नेमण्यात आली आहे. पावसामुळे काही ठिकाणी झाडांच्या फांद्या तसेच रस्त्यांवर पाणी साचल्याच्या किरकोळ तक्रारी आपत्ती निवारण कक्षाकडे आल्या.**



त्याची दखल घेत त्या सर्व सोडविण्यात आल्याचे आपत्ती व्यवस्थापन अधिकारी गणेश सोनुने यांनी सांगितले.हवामान विभागासह सी-डॅक यांनी शहरात मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता वर्तविली होती. या पार्श्वभूमीवर महापालिकेच्या १५ क्षेत्रीय कार्यालयांच्या सहाय्यक आयुक्तांना सावधानतेच्या सूचना देण्यात आल्या होत्या.आपत्कालीन स्थिती निर्माण झाल्यास त्यावर तातडीने उपाययोजना करण्यासाठी पथके नेमण्यात आली आहे. मल:निस्सारण

### जलसंपदा विभाग संपर्कात

महापालिकेच्या कर्मचाऱ्यांनी घटनास्थळी जात पाहणी करुन तुंबलेल्या पाण्याला वाट करुन दिली. घाटमाथा परिसरात पावसाचा जोर कायम राहिल्यास आणि धरणातून विसर्ग करण्यास सुरुवात झाल्यास त्याचा कोणताही परिणाम नागरिकांवर होऊ नये, यासाठी जलसंपदा विभागासह पोलीस खात्याच्या संपर्कात असल्याचे आपत्ती व्यवस्थापन अधिकारी सोनुने यांनी सांगितले.

विभागातील अधिकाऱ्यांसह क्षेत्रीय कार्यालय पातळीवरील पथकांचा यामध्ये समावेश आहे.शहरात 'रेड अलर्ट' देण्यात आल्याने महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त पृथ्वीराज बी. पी. यांनी सोमवारी सकाळी आपती व्यवस्थापन कक्षातील अधिकाऱ्यांशी संवाद साधून सूचना दिल्या.'हवामान विभागाने 'रेड अलर्ट' दिला असला तरी सोमवारी झालेला पाऊस हा घाटमाथ्यावर पडत आहे. शहरात सकाळपासून संततधार आहे. त्यामुळे बाणेर, शंकरशेठ रस्ता, येरवडा येथील गुंजन टॉकीज यासह काही भागातील रस्त्यांवर पाणी साचल्याच्या किरकोळ तक्रारी महापालिकेकडे आल्या.

**कॅमेरे बंद** पिंपरी-चिंचवडमध्ये मोक्याच्या ठिकाणी पोलीस तपासात अडथळे

# शहराची सुरक्षा रामभरोसे!

## 544 कोटींचा खर्च करून बसविलेले सीसीटीव्ही बंद!; महापालिकेचा आणखी एक स्मार्ट घोटाळा उघड

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी कॅम्प परिसरातील भर चौकात असणाऱ्या दुकानात एका व्यापाऱ्यावर गोळीबार करण्यात आला. दिवसाढवळ्या चोरट्यांनी व्यापाऱ्याच्या गळ्यातील चैन ओढत गोळीबार केला यानंतर सीसीटीव्ही फुटेज तपासणी केल्यानंतर धक्कादायक प्रकार उघड झाला. शहरातील मोक्याच्या ठिकाणचे सीसीटीव्ही बंद असल्याचे या प्रकारानंतर समोर आले आणि पिंपरी चिंचवड महापालिकेचा तब्बल 544 कोटींचा सीसीटीव्ही चा आणखी एक स्मार्ट घोटाळा उघडकीस आला.**

### 5,500 सीसीटीव्हीपैकी 1,800 कार्यरत



पिंपरी चिंचवड शहरामध्ये दोन प्रमुख यंत्रणांच्या माध्यमातून सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले आहेत. महापालिकेच्या वतीने 'मॅट्रिक्स' कंपनीकडून बसविण्यात आलेल्या 1,800 कॅमेऱ्यांपैकी फक्त 1,000 कॅमेरे कार्यरत आहेत. तर स्मार्ट सिटी प्रकल्पांतर्गत बसविण्यात आलेल्या तब्बल 3,000 कॅमेऱ्यांपैकी केवळ 800 कॅमेरे सुरू आहेत.

शहरातील कायदा व सुव्यवस्था राखणे, गुन्हे रोखणे आणि तपासात ठोस पुरावे मिळविणे, यासाठी सीसीटीव्ही कॅमेरे हा महत्त्वाचा मानला जातो. मात्र, पिंपरी-चिंचवड शहरामध्ये कोट्यवधी रुपयांचा खर्च करून बसविण्यात आलेले बहुतांश बंद असल्याचे वास्तव धक्कादायक आहे. परिणामी, पोलिसांना गुन्ह्यांचा मागोवा घेणे, वाहन क्रमांक ओळखणे आणि घटनास्थळावरील हालचाली टिपणे या महत्त्वाच्या तपास प्रक्रियांमध्ये अडथळे येत आहेत.

> शहरात सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यासाठी कोट्यवधी रुपये खर्च झाले. मात्र, देखभाल न झाल्याने त्याचा नागरिकांना थेट फायदा होत नाही. कराच्या पैशांतून उभारलेली सुविधा बंद पडणे ही गंभीर बाब आहे. कॅमेरे केवळ नावापुरते असतील, तर अशा योजनांचा हेतूच फोल ठरतो. सीसीटीव्ही योजनेत संचालक मंडळाने मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार केला आहे. याची चौकशी होऊन दोषींवर कडक कारवाई करावी.
> **-मारुती भापकर,** सामाजिक कार्यकर्ते, पिंपरी-चिंचवड

**सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्यासाठी तब्बल 544 कोटींचा खर्च**

महापालिकेच्या वतीने २,४९० सीसीटीव्ही कॅमेरे ४६० ठिकाणी बसवण्यात आले त्यावर १४७ कोटी खर्च करण्यात आला. स्मार्ट सिटी उपक्रमांतर्गत ३ हजार कॅमेरे १००० ठिकाणे निश्चित करून बसविण्यात आले त्यावर २५० कोटी खर्च करण्यात आला. याशिवाय महापालिका (नियोजित) २,४९० कॅमेरे आणखी ४६० ठिकाणी बसविण्यात येत आहेत त्यावर १४७ कोटी खर्च मंजूर करण्यात आलेला आहे

**शहराची सुरक्षा रामभरोसे**

शहरात केवळ सरकारी 1800 कॅमेरे सुरू आहेत. उर्वरित कॅमेरे तांत्रिक बिघाड, वीजजोडणीतील अडथळे, पावसामुळे नुकसान, बॅटरी व केबल चोरी तसेच देखभाल अभावामुळे बंद पडले आहेत. त्यामुळे शहरातील कॅमेऱ्यांची एकूण कार्यक्षमता ३३ टक्क्यांपेक्षा कमी आहे.शहरातील व्यापारी संकुले, सोसायट्या, उद्योग, हॉटेल यांना सीसीटीव्ही बसविणे बंधनकारक असून, काही महिन्यांचे फुटेज साठवणेही नियम आहे. मात्र, खर्च टाळण्यासाठी अनेकांनी हा नियम मोडला आहे. काही सोसायट्यांनी फक्त नावापुरते कॅमेरे लावले असून प्रत्यक्षात ते बंद असल्याचे प्रकार मोठ्या प्रमाणात दिसून येत आहे.


# इंद्रायणी व पवना नदी प्रदूषणामुक्तीसाठी पुढाकार!

## आमदार महेश लांडगे यांची प्रस्तावित प्रकल्पासंदर्भात बैठक घेण्याची मागणी

। पिंपरी-चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**इंद्रायणी आणि पवना नद्यांमधून दररोज पिंपरी-चिंचवड शहरासाठी 500 ते 600 एमएलडी पाणी उचलले जाते. सुमारे 30 लाख नागरिकांच्या आरोग्याशी संबंधित असलेल्या या पाण्याची गुणवत्ता दिवसेंदिवस घसरत असून, त्यावर तातडीने उपाययोजना करणे आवश्यक आहे. याच पार्श्वभूमीवर भाजपा आमदार महेश लांडगे यांनी पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे (PMRDA) महानगर आयुक्त योगेश म्हसे यांच्याकडे नदी प्रदूषणावर उपाययोजना व सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प उभारणीसाठी तातडीची बैठक घेण्याची मागणी केली आहे.**

### 'पीएमआरडीए' महानगर आयुक्त योगेश म्हसे यांना सूचना



क्षेत्रात झपाट्याने नागरीकरण, शहरीकरण आणि औद्योगिकीकरण झाले असून, त्याचा थेट परिणाम झाला आहे. अनेक ठिकाणी विना प्रक्रिया सांडपाणी आणि रसायनमिश्रित औद्योगिक सांडपाणी नदीत सोडले जात धोक्यात आली असून, पाण्यातील ऑक्सिजनची पातळी शून्यावर पोहचली आहे.

> "इंद्रायणी व पवना या नद्या केवळ पाण्याचा स्रोत नाहीत, तर पिंपरी-चिंचवडकरांच्या आरोग्यासाठी जीवनदायींनी आहेत. सुमारे ३० लाख नागरिकांच्या आरोग्यावर त्याचा थेट परिणाम होतो, हे लक्षात घेता तातडीने सांडपाणी प्रक्रिया प्रकल्पांची गरज आहे. निघोजे आणि रावेत बंधाराच्या वरील बाजूस सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प राबविणे अत्यावश्यक असून, प्रशासनाने आता गतीने आणि सकारात्मकतेने निर्णय घ्यावा. आणि ऐका ना यासाठी सविस्तर बैठक घेण्यात येणार आहे. "
> **–महेश लांडगे,** आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या निर्देशानुसार, पीएमआरडीए प्रशासनाने पवना-इंद्रायणी नदी सुधार प्रकल्प हाती घेतला आहे. मात्र, यासाठीच्या सांडपाणी प्रक्रिया प्रकल्पांच्या उभारणीला गती देणे आवश्यक असल्याचे आमदार लांडगे यांनी आपल्या पत्रात स्पष्ट केले आहे.

**निघोजे व रावेत बंधाऱ्यांच्या वरच्या बाजूस प्रकल्प सुरु करावेत...**

निघोजे आणि रावेत बंधाऱ्याच्या वरच्या बाजूला ज्या ठिकाणी जमीन ताब्यात असून प्रदूषणाची तीव्रता अधिक असल्याने, येथे प्राधान्याने सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प उभारण्यात यावेत, अशी आग्रही भूमिका आमदार लांडगे यांनी मांडली आहे. "सुमारे 30 लाख नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीने ही बाब अत्यंत गंभीर असून, प्रशासनाने सकारात्मक भूमिकेतून त्वरित निर्णय घ्यावा," असे आवाहनही आमदार लांडगे यांनी केले आहे.



## भूमिका

# कितिक पिवसान बापहो?

**येच्याआंदी आपून आपल्या लेखाईतून शाळेत होनारं गँदरींग न् चांगल्या शिक्षनासाटी प्रायव्हेट शिकवन्या म्हंजे ट्यूशन क्लासेस यातून विद्यार्थ्यांईच्या पालकाईले जो आर्थिक तरास होते त्याचा हिसोब घेतला होता.आता आपुन प्रत्यक्ष शाळेच्या शिक्षनातून बी पालक कशे काय पियल्या जातात ते पाहू!**

आपलं घोळं दुनियेच्या शर्यतीत मांगं राहू नोय म्हनून सा-याच मायबापाची मरमर असते. त्यासाटी वखद पळ्ला तं बिचारे उपाशी राहाले बी मांगं पुळं पायत नाईत. आपले उली-उली लेकरं साजरे शिस्तीत येखांदी इंग्रजीतली प्रार्थना म्हंतानी पाऊन त्याईले जन्म सफल झाल्यावानी वाट्टे.चांगलं शिक्षन याच लान लान गोठीतून दिसून पळते हे खरं हाये.पन मायबापाचा यात अक्षरशः उसासारका चेंदामेंदा करून त्याईले हुईन तितलं या शिक्षनव्यवस्थेनं पियनं लावलं. कसं?? शाळेतनी अनेक वैयक्तिक संस्थाईकून स्पर्धा घेतल्या जातात. ऑलिम्पियाडसारक्या हजारो रूपये फी उकळून चार रूपयाचं मेडल देना-या परिक्षा कायले शाळाईनं कायले पायजे? स्कॉलरशिप, नवोदय विद्यालय,अशा परिक्षा असतातात्च ना! अल्लग अल्लग कोर्सेस चं एंडोर्समेंट म्हंजे जाहिरातबाजी शाळेत काहाले पायजे? शाळा उन्हायात रिकामी राहू नोय म्हनून समर कँम्प! काईबी शिकवाचा धंदा सायाचा!शाळेतला विद्यार्थी



पुळे उद्योगधंदा करून आपल्या पायावर उभा राहाव म्हनून न्या-या न्या-या स्पर्धा घेतल्या जातात. शाळेतल्या आनंदमेल्यात खायच्या पदार्थाचे, खेळाचे, कलाकुसरीच्या वस्तूचे स्टॉल लावातंत.त्यातल्या टेबलाचं भाळं बी शाळा घेते. तीन लेकराईनं येक स्टॉल लावून त्याईनं तिनशे रूपये कमावले अस्तीन तं शंभर रूपये स्टॉलचं भाळं घेतात. मंग घ्या वाटून तिघाईत दोनशे, वा रे वा याईचं व्यवसाय मार्गदर्शन! अमक्याच दुकानातून शाळेचे कपळे,ढमक्याच दुकानातून पुस्तकं,टमक्याच दुकानातले बुटमोजे हे तं कईपासून होतंच. त्यात भर पळ्ली शाळेतच आमी स्पोर्ट्स शिकोतो म्हनून जास्तीची पाच-पाच हजार रूपये फी भरा लागते न् त्याच्या मांगं स्पोर्ट्स चे कपळे न् स्पोर्ट्स बुटं, इंस्ट्रुमेंट्स् आलेच. लेकरू शाळेत नाचात भाग घेत अशिन,काई कारेक्रम अशिन नाईतं फँसी ड्रेस स्पर्धा अशीन तं आमी सांगू तथूनच तुमाले भाळ्यान कपळे आना लागतीन...समजलं?? कदी पुरा युनिफॉर्म नशिन तं त्याचा दंड अल्लग,शाळेत सायकल स्टँडचं वर्षाचं भाळं अल्लग! शाळेतलीच कँटीन न् तथुल्लंच खानं पायजे.

इतलं कमी म्हनून का काय शाळेत पाचवीपासूनच क्लास घेतीन म्हंतात पुळच्या करियरसाटीचे तं मायबापाले घिऊन मिटींगले या. कायले? कारन मायबापच तं टार्गेट हायेत त्याईचे.पैसा तं आखरी त्याईच्याच खिशातून काळनं हाये कानी? हे बी ठिक हाये येक खेप. निदान हे सारं सारं लेकरायच्या भविष्याचं सपनं दाखून सुरू असते. हे सारं सारं शिकोतीन,घिऊन मांगतीन,पैसा कमावतीन पन शिक्षन घ्याले मात्र हे प्रायव्हेट टिवशनाच लावाले लावतीन. कारन शाळेत नेमका कितिक टाईम कामी आनतात त्याचा हिसोब आपुन लावूच शकतो. सनवार,दिवाई,नाताळ,उन्हायाच्या सुट्टया वजा करून वर्सातून चार खेपा तं अर्ध्या वर्गाले डान्स प्रॅक्टिस च्या नावाखाली न् अर्धा वर्ग डान्स प्रॅक्टिस ले गेला म्हनून बाकीच्याईले कवळीभरई शिकोत नाईत. न् त्यात का तुमचा पाल्य वर्गात 'तुमी शिकोत ना' म्हनून गैरहजर रायला तं बापाबापा शाळेले असा पुयका येते लेकराच्या भविष्याचा का पुसू नोका. काऊन्सीलर काय आन्तीन, 'तुमचं लेकरू हुशार हाये...पन' असं म्हनून कायजीच काय दाखोतीन! वर मायबापानं लेकराले टाईम देला नाई तं काय काय हू शकते म्हनून भेवाडून देनं न् मायबापानं टाईम देनं काऊन आवश्यक हाये हे समजाऊन आपली बी परेड घेतल्या जानं...मंग तुमी कित्तीकबी तीसमारखां असा!! हे सारं खरं मानून न् 'आता हेच आपली जिंदगी हाये,दुसरी शाळा येच्यावूनई खर्चिक हाये' म्हनून शाळेची आपल्या आयुष्यातली अळचन आपुन फक्त 'लेकराच्या चांगल्या भविष्यासाटी' सईन करत असतो.पन परिक्षा झाली न् पेपरं पाहाले शाळेत बलावलं का ठुलीच व्हय पालकाईपुळं चिठ्ठी. "या या दुकानात पुळच्या वर्षीचे पुस्तकं भेटतीन.न् पुळच्या वर्षीच्या फी चा हप्ता याच मैन्यात भरा नाईतन् दाहा रूपये दरोजची लेट फी लागीन.'

## प्रासंगिक »

# पतितपावन!

***रशियाकडून युद्धविरामाचे आश्वासन घेण्यात ट्रम्प यांस यश आले असते तर त्यामुळे भारतावरील दबाव कमी होण्यास मदत झाली असती. तसे झाले नाही...***

तुम्हाला काही भावभावना असतील असे तुमच्या डोळ्यात पाहून वाटत नाही", (आय डोंट थिंक यू हॅव अ सोल) असे थेट विधान व्लादिमिर पुतिन यांचा हात हातात घेऊन करण्याची हिंमत अमेरिकेचे माजी अध्यक्ष जो बायडेन यांनी दाखवली होती. त्यांचे ते विधान किती द्रष्टे होते याचा करुण साक्षात्कार मर्दुमकीचा आव आणणाऱ्या, स्वत:स 'डीलमेकर' म्हणवून घेणाऱ्या तोंडाळ डोनाल्ड ट्रम्प यांना पुतिन यांच्या बहुचर्चित अलास्का चर्चाभेटीनंतर निश्चित आला असणार. 'मी पुतिन यांना सरळ करीन', 'त्यांना शांततेसाठी भाग पाडीन' 'त्यांच्यावर दणदणीत निर्बंध लादीन' अशी एकापेक्षा एक वावदूक विधाने या वाजत्यागाजत्या चर्चेआधी करणाऱ्या ट्रम्प यांच्या हाती पुतिन यांनी या अलास्का चर्चेत शब्दश: धत्तुरा दिला आणि जगाने इतकी वर्षे युद्धखोरीसाठी बहिष्कृततेची शिक्षा दिलेले पुतिन पुन्हा पतितपावन होऊन मायदेशी रवाना झाले.

आंतरराष्ट्रीय श्रम संघटनांच्या (आयएलओ) इंडिया एम्प्लॉयमेंट रिपोर्ट २०२४ नुसार, रोजगार, शिक्षण आणि प्रशिक्षणातही नसलेल्या तरुणांचे प्रमाण भारतात २०१० पासून २०१९ पर्यंतच्या काळात श्रमबळाच्या सुमारे २९.२ पर्यंत वाढलेले होते. महिला श्रमिकांची स्थिती त्याहून वाईट आहे.

# बेरोजगारीचा चढता आलेख चिंताजनक!

देशात सर्वात मोठी निराशा बेरोजगारीच्या प्रश्नावर आहे. आंतरराष्ट्रीय श्रम संघटनांच्या (आयएलओ) इंडिया एम्प्लॉयमेंट रिपोर्ट २०२४ नुसार भारतात श्रम करणाऱ्यांचे लोकसंख्येमधील प्रमाण २०११ मध्ये ५९ होते आणि २०२१ मध्ये ते ६३ झाले. पुढील सुमारे १५ वर्षे हे प्रमाण असेच राहणार आहे असा अंदाज आहे. उत्पादनवाढीसाठी नवे स्वयंचलित तंत्रज्ञान वापरले जात असल्याने उत्पादन (म्हणजे राष्ट्रीय स्थूल उत्पन्न) वाढते, परंतु त्या प्रमाणात रोजगार वाढत नाही आहे. जे राजकीय पक्ष बेरोजगारीबद्दल विविध प्रकारची अशक्यप्राय आश्वासने देतील त्यांना जनतेनेच विचारावयास हवे की हे कसे शक्य होणार हे सांगा. या बेरोजगारीमुळेच (साहजिकच) प्रत्येक समाजगट म्हणतो की आम्हाला आमच्या प्रमाणात सरकारी नोकऱ्यांमध्ये आरक्षण द्या. रोजगार नसल्यामुळे हिंसा, लैंगिक गुन्हे, सामान्य गुन्हेगारी वाढत आहे हे लक्षात



घेणे आवश्यक आहे. विकासकामांतील बराचसा रोजगार कंत्राटी असतो, तो अनिश्चिततेची तलवार टांगती ठेवतो. २०२४ च्या निवडणुकीत हा मुद्दा त्या तीव्रतेने चर्चेत आला नाही. आजकाल अनेक छोट्या कारखान्याबाहेर आणि आसपास 'हेल्पर पाहिजे', 'टर्नर पाहिजे', ऑपरेटर पाहिजे' असे फलक दिसतात. हे फलक पाहून अल्पशिक्षित, अननुभवी कामगार तेथे कामावर हजर होतात. पण बहुतेक वेळा एक-दोन दिवसांतच, 'मिळत असलेले काम आवडीचे नाही, अपेक्षित पगार अथवा वाढ नाही, काम शारीरिक कष्टाचे आहे, संस्था प्रतिष्ठित नाही, कामाच्या ठिकाणाचे वातावरण चांगले नाही, एम्प्लॉयरच्या अपेक्षा फार आहेत, अधिक वेळ काम करावे लागते, सुट्ट्या कमी, कामाच्या वेळा सोयीच्या नाहीत, घरापासून लांब आहे' अशी कारणे पुढे करून तो कामगार नोकरी सोडून देताना आढळतो. आलेली संधी जर ही मुले नाकारत असतील तर त्यांना बेरोजगार का म्हणायचे हा खरा प्रश्न पडतो. याउलट अपवादात्मक एखादा खरा गरजू कामगार-कर्मचारी कामावरून सुटल्यावर झोमॅटोच्या डिलिव्हरीज करून आणखी दीड-दोनशे रूपये पदरात पाडून घेताना आढळतो. कोणतेही काम कमी प्रतीचे समजू नका, असे सांगितले जाते. गाडगे महाराजांनी रस्ते झाडले, मंदिरे साफ केली अशी उदाहरणे दिली जातात. अशा लोकांच्या प्रतिमा घरात लावून त्यांची पूजा केली जाते, पण त्यांचे अनुकरण करण्याची मात्र आम्हाला लाज वाटते. भारतीय मुले शिकायला अमेरिकेत गेल्यावर आपल्याकडे कमी प्रतीची समजली जाणारी कामे सहजगत्या करतात.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

## मुंबई रेड अलर्ट मुख्यमंत्री फडणवीस यांचे सर्व यंत्रणांना सतर्कतेचे निर्देश

# मुंबईत बारा तास पावसाचा रेड अलर्ट!

## १६ जिल्ह्यांमध्ये ऑरेंज अलर्ट

। मुंबई ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**महाराष्ट्रातल्या विविध भागांमध्ये जी अतिवृष्टी होते आहे, त्यासंदर्भात आपल्या राज्याच्या कंट्रोल रुमवरुन राज्यात संवाद साधला. जिल्हाधिकारी, विभागीय आयुक्त ऑनलाइन उपलब्ध होते. मागचे दोन दिवस काही भागांमध्ये अतिवृष्टी होते आहे. तसंच १८ ते २१ या दिवसांमध्येही १५ ते १६ जिल्ह्यांमध्ये रेड आणि ऑरेंज अलर्ट आहे. लोकांची गैरसोय होणार नाही याकडे आम्ही लक्ष देत आहोत, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे. देवेंद्र फडणवीस यांनी काही वेळापूर्वीच माध्यमांशी संवाद साधला.**



आम्ही कोकण भागात कुंडलिका, वसिष्ठी नदीच्या पतळीवर नजर ठेवली आहे. आवश्यक ते प्लानिंगही करण्यास सांगितलं आहे. नाशिक विभागात तापी आणि हतनूरला मोठ्या प्रमाणात पाणी रावेरमध्ये शिरलं आहे. जळगाव जिल्ह्यात सर्वाधिक फटका बसला आहे. घरांचं नुकसान, प्राण्याचं नुकसान झालं आहे. पुणे जिल्ह्यात सगळ्या धरणांमध्ये पाणी आहे, पण धरण इशारा पातळीवर नाही असंही देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे. आपण छत्रपती संभाजीनगर भागात पाहिलं तर बीड, लातूर आणि नांदेड या ठिकाणी पूरस्थिती आहे. नांदेड जिल्ह्यातील मुखेडच्या भागात ढगफुटी सदृश पाऊस झाला. पाच लोक बेपत्ता झाले. १५० हून अधिक प्राण्यांचा मृत्यू झाला. त्या ठिकाणी एसडीआरएफ, एनडीआरएफची टीम कार्यरत आहेत. रेड आणि अलर्ट असेल त्या भागांमध्ये लोकांनी गरज असेल तरच बाहेर पडलं पाहिजे. धबधबे, तलाव या ठिकाणी उत्साहाने जाण्याची इच्छा अनेक तरुणांना असते.

असं वाटणं काही गैर नाही. पण सावधगिरी बाळगली पाहिजे असंही आवाहन देवेंद्र फडणवीस यांनी केलं.राज्यात अतिवृष्टी सुरू असल्याने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महसूल, आपत्कालीन व पोलिस यंत्रणेला सतर्कतेचे आणि मदतकार्यात सहभागी होण्याचे आदेश दिले आहेत. नांदेड जिल्ह्यात ढगफुटीसदृश अतिवृष्टी झाल्याने मदतीसाठी लष्कराची तुकडी पाठविण्यात आली आहे. पावसाने मुंबई, ठाणे, रायगडसह संपूर्ण कोकणपट्टी, पश्चिम महाराष्ट्र, विदर्भ व मराठवाड्यासह राज्यातील बहुतांश भागात सोमवारी अक्षरश: थैमान घातले.

### विशेष लक्ष देण्याचे निर्देश

काही नद्यांनी धोकापातळी ओलांडली असून जळगावमध्ये मोठे नुकसान झाले आहे. अलमट्टीबाबत कर्नाटक सरकारशी सातत्याने संपर्क ठेवला जात असून, सध्या धोका नसला तरी आपत्कालीन परिस्थितीला तोंड देण्यासाठी सर्व यंत्रणा सज्ज ठेवण्याचे आदेश फडणवीस यांनी दिले. मुखेडमधील परिस्थिती नियंत्रणात आली असून, विष्णुपुरीकडे विशेष लक्ष देण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

नांदेड, चिपळूण, कोल्हापूरसह अनेक भागांमध्ये नद्यांना पूर आला आहे. मुंबई, ठाणे जिल्ह्याला पावसाने झोडपून काढल्याने माटुंगा व अन्य ठिकाणी रेल्वे रूळावर पाणी साचले. त्यामुळे उपनगरी रेल्वेसेवाही रडतखडत सुरू होती. फडणवीस यांनी सोमवारी दुपारी मंत्रालयातील राज्य आपत्ती व्यवस्थापन कक्षात राज्यातील पावसाच्या स्थितीचा आढावा घेतला.यावेळी आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन, माहिती तंत्रज्ञान मंत्री ॲड. आशिष शेलार, मुख्य सचिव राजेशकुमार, जलसंपदा विभागाचे अपर मुख्य सचिव दीपक कपूर, आपत्ती व्यवस्थापन अपर मुख्य सचिव सोनिया सेठी, कृषी विभागाचे प्रधान सचिव विकासचंद्र रस्तोगी, सार्वजनिक बांधकाम विभागाचे सचिव संजय दशपुते तसेच वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. यावेळी सर्व विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी दूरदृश्य संवाद प्रणालीद्वारे बैठकीत सहभागी झाले.या बैठकीत विभागीय आयुक्तांनी आपल्या विभागातील पावसामुळे निर्माण झालेल्या आपत्कालीन परिस्थितीची माहिती सादर केली. रत्नागिरी, रायगड आणि हिंगोली जिल्ह्यांत अधिक पाऊस झाला असून, हवामान खात्याने १७ ते २१ ऑगस्टदरम्यान अतिवृष्टीचा इशारा दिला आहे. त्यामुळे पुढील काही दिवस सर्व शासकीय यंत्रणांना सतर्क राहण्याचे आदेश फडणवीस यांनी दिले.मागील दोन दिवसांत राज्यात विविध घटनांमध्ये सात जणांचा मृत्यू झाला आहे.

# भर पावसात शक्तिपीठ विरोधात आंदोलन

## कोणत्याही परिस्थितीत महामार्ग होऊ न देण्याचा शेतकऱ्यांचा निर्धार

। मुंबई ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**दिवसभर मुसळधार पाऊस असतानाही आजरा येथे प्रस्तावित शक्तिपीठ महामार्गाला विरोध दर्शवण्यासाठी शेतकरी रस्त्यावर उतरले. कोणत्याही परिस्थितीत शक्तिपीठ महामार्ग होऊ न देण्याचा निर्धार यावेळी शेतकऱ्यांनी व्यक्त केला. गणेशोत्सवानंतर शक्तिपीठ विरोधातील लढा आणखी तीव्र केला जाईल, असा इशारा काँग्रेसचे विधान परिषदेतील गटनेते सतेज पाटील यांनी दिला.**



आजरा, गडहिंग्लज, चंदगड, भुदरगड तालुक्यातील शेतकरी सहभागी झालेला मोर्चा आजरा शहरातील शिवतीर्थ ते आजरा तहसील कार्यालया पर्यंत निघाला. माजी खासदार राजू शेट्टी, जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष आमदार सतेज पाटील, विजय देवणे, संपत देसाई यांनी मोर्चाचे नेतृत्व केले.गेल्या चार दिवसापासून आजरा शहरासह तालुक्यात पावसाचा जोर वाढला आहे. या परिस्थितीतही शक्तिपीठ महामार्ग विरोधी कृती समितीने शक्तिपीठ विरोधात मोर्चाची हात दिली होती. मुसळधार पावसामुळे मोर्चाला कितपत प्रतिसाद मिळणार असे वातावरण होते. तथापि या आंदोलनाला शेतकरी नागरिक यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. शिवतीर्थावरील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याला पुष्पहार घालून मोर्चाला सुरुवात झाली. शेती कामासाठी वापरण्यात येणार इरले डोक्यावर घेऊन महिलाही सहभागी झाल्या होत्या. एकच जिद्द शक्तिपीठ रद्द, जमीन आमच्या हक्काची नाही कुणाच्या बापाची, भाजप सरकारचा निषेध असो अशा घोषणांनी मोर्चाचा मार्ग दणाणून गेला. छत्रपती संभाजी चौकातून मोर्चा आजरा तहसील कार्यालया जवळ आला. यावेळी मान्यवरांनी आपले मनोगत व्यक्त केले.

### आमिषाला बळी पडू नये

आमदार सतेज पाटील म्हणाले, यापूर्वीही अनेक प्रकल्प झाले आहेत त्या प्रकल्पांना आम्ही कधीही विरोध केला नाही. मात्र शक्तिपीठ महामार्ग हा ठेकेदारासाठी होत असल्यामुळे याला आमचा विरोध आहे. यापूर्वी देशाच्या स्वातंत्र्याची लढाई झाली, आता शेतीच्या रक्षणासाठी पुन्हा एकदा स्वातंत्र्याची लढाई लढावी लागेल. शेतकऱ्यांनी पैसे मिळण्याचे आमिषाला बळी पडू नये.

राहुल गांधींचा इशारा

## निवडणूक आयोगाच्या आयुक्तांना मोठा इशारा

# जर तुम्ही तुमचं काम केलं नाही तर..!

## तुमच्यावर कठोर कारवाई केली जाईल

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधींनी काही दिवसांपूर्वी एक पत्रकार परिषद घेत केंद्रीय निवडणूक आयोगाच्या कार्यशैलीवर जोरदार टीका केली होती. तसेच मतदान प्रक्रियेत अनियमितता झाल्याचा आरोप करत पत्रकार परिषदेच्या माध्यमातून काही पुराव्यांचं सादरीकरण केलं होतं. दरम्यान, राहुल गांधींनी केलेल्या आरोपानंतर देशभरात खळबळ उडाली होती. राहुल गांधींच्या आरोपानंतर निवडणूक आयोगाने १७ ऑगस्ट रोजी पत्रकार परिषद घेत आरोपांना उत्तर देत सर्व आरोप फेटाळून लावले.**





तसेच राहुल गांधींनी केलेल्या मत चोरीच्या आरोपांना उत्तर देताना निवडणूक आयोगाने राहुल गांधींनाच इशारा दिला होता. मतचोरी सारख्या चुकीच्या शब्दाचा वापर करण्यात आल्याने हा भारतीय संविधानाचा अपमान असल्याचं मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांनी म्हटलं होतं. तसेच राहुल गांधींनी मत चोरीच्या आरोपांबाबत ७ दिवसांत शपथपत्र सादर करावं किंवा देशाची माफी मागावी, असं मुख्य निवडणूक आयुक्तांनी म्हटलं होतं.त्यानंतर आता राहुल गांधींनी निवडणूक आयोगाच्या तीनही आयुक्तांना मोठा इशारा दिला आहे. 'तीनही निवडणूक आयुक्तांनी एक गोष्ट नीट समजून घ्यावी, जर तुम्ही तुमचं काम केलं नाही तर इंडिया आघाडीचं सरकार आल्यावर तुमच्यावर कठोर कारवाई केली जाईल', असा इशारा राहुल गांधींनी दिला आहे. या संदर्भातील वृत्त एएनआयने एक्सवर (ट्विटर) दिलं आहे.बिहारमधील मतदार अधिकार यात्रेदरम्यान बोलताना राहुल गांधी म्हणाले की, "जेव्हा ते 'मत चोरी' करतात तेव्हा ते या आत्म्यावर (संविधानावर) हल्ला करतात.

ते संविधानावर हल्ला करतात, ते भारतमातेवर हल्ला करतात. मात्र, आम्ही पंतप्रधान नरेंद्र मोदी किंवा निवडणूक आयोगाला यावर हल्ला करू देणार नाही. हे संविधान कोणीही मिटवू शकत नाही. निवडणूक आयुक्तांनो एक गोष्ट नीट समजून घ्या, जर तुम्ही तुमचं काम केलं नाही तर इंडिया आघाडीचं सरकार आल्यानंतर तुमच्यावर कठोर कारवाई केली जाईल."राहुल गांधींच्या मत चोरीच्या आरोपांना निवडणूक आयोगाने काही नेते मतदारांची दिशाभूल करत असल्याचं म्हटलं. मात्र, निवडणूक आयोग अशा खोट्या आरोपांना घाबरत नाही. तसेच मतचोरी सारख्या चुकीच्या शब्दाचा

### तीनही आयुक्तांना इशारा

चुकीच्या शब्दाचा वापर करण्यात आल्याने हा भारतीय संविधानाचा अपमान असल्याचं मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांनी म्हटलं होतं. तसेच राहुल गांधींनी मत चोरीच्या आरोपांबाबत ७ दिवसांत शपथपत्र सादर करावं किंवा देशाची माफी मागावी, असं मुख्य निवडणूक आयुक्तांनी म्हटलं होतं.त्यानंतर आता राहुल गांधींनी निवडणूक आयोगाच्या तीनही आयुक्तांना मोठा इशारा दिला आहे.

वापर करण्यात आल्यामुळे हा भारतीय संविधानाचा अपमान असल्याचं मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांनी म्हटलं. तसेच राहुल गांधी यांनी मत चोरीच्या आरोपांबाबत सात दिवसांत शपथपत्र सादर करावं किंवा देशाची माफी मागावी असा इशारा निवडणूक आयोगाने दिला. निवडणूक आयोगाने केलेल्या या टिकेनंतर आता विरोधक चांगलेच आक्रमक झाल्याचं बोललं जात आहे. कारण इंडिया आघाडीचे नेते मुख्य निवडणूक आयुक्तांच्या विरोधात महाभियोगाचा प्रस्ताव मांडण्याच्या विचारात असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात आहे. सूत्रांच्या माहितीनुसार, राज्यसभेतील खासदार आणि काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या विरोधी पक्षाच्या नेत्यांच्या बैठकीत या विषयावर चर्चा झाल्याचं इंडियन एक्स्प्रेसने एका वृत्तात म्हटलं आहे.जेव्हा निवडणूक आयोगाच्या खांद्यावर बंदूक ठेवून भारताच्या मतदारांना लक्ष्य करत राजकारण केले जाते, अशावेळी निवडणूक आयोग प्रत्येकाला स्पष्ट करू इच्छितो की निवडणूक आयोग गरीब, श्रीमंत, वृद्ध, महिला, तरुण यासह सर्व स्तरातील, सर्व धर्मांच्या सर्व मतदारांबरोबर कोणताही भेदभाव न करता खंबीरपणे उभा आहे." पुढे बोलताना त्यांनी राहुल गांधी यांनी केलेली वक्तव्य ही संविधानाचा अपमान असल्याचे म्हटले आहे, तसेच मत चोरी यासरखे शब्द हे लोकशाही संस्थांना कमकुवत करतात असेही निवडणुक आयुक्त म्हणाले.

---

# शुक्ला यांच्या मोहिमेचा सर्वांना अभिमान

## काँग्रेसचे शशी थरूर यांच्याकडून अंतराळवीर शुभांशूचे कौतुक

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**अंतराळवीर शुभांशू शुक्ला यांच्या पहिल्या आंतरराष्ट्रीय अवकाश स्थानकाच्या मोहिमेवर सोमवारी लोकसभेत चर्चा झाली. यावेळी 'एसआयआर'च्या मुद्द्यावरून निदर्शने करणारे काँग्रेस सदस्य चर्चेत सहभागी झाले नाहीत. मात्र, काँग्रेस नेते शशी थरूर यांनी शुक्ला यांच्या मोहिमेचे कौतुक केले. सर्व भारतीयांना त्यांच्या मोहिमेचा अभिमान आहे.**



'भारताच्या महत्त्वाकांक्षी मानवी अवकाशमोहिमेसाठी ही मोहीम एक महत्त्वाची प्रतीक ठरेल,' असे ते म्हणाले.थरूर म्हणाले, 'शुक्ला यांच्या यशस्वी मोहिमेमुळे नव्या पिढीला विज्ञान-तंत्रज्ञान, अवकाश, गणित, अभियंता क्षेत्रांत करिअर करण्याची प्रेरणा मिळेल. या विषयावरील विशेष चर्चेत विरोधक सहभागी नाहीत. 'सर्व भारतीयांना कमांडर शुक्ला यांच्या या मोहिमेचा अभिमान आहे,' असे मी त्यामुळे म्हणतो.''राष्ट्रीय स्वाभिमानाचे आणि यशाचे जे विषय असतात, त्या वेळी विरोधकांनी पक्षीय

### भारताचे २०४० मध्ये चंद्रावर पाऊल

'भारतीय अंतराळवीर २०४० मध्ये चंद्रावर पाऊल ठेवून विकसित भारताची नांदी करील,' यांच्या आंतरराष्ट्रीय स्थानकावरील प्रवासावर लोकसभेत चर्चा झाली. त्या वेळ ते बोलत होते. २०२० मध्ये खासगी क्षेत्राला अवकाश क्षेत्र खुले केल्यानंतर अवकाश क्षेत्रातील भारताची गुंतवणूक ८ अब्ज डॉलरपर्यंत गेली असून, पुढील दशकभरात ती ४५ अब्ज डॉलरपर्यंत जाईल, असे ते म्हणाले.

राजकारणाच्या चौकटीतून बाहेर यावे,' अशी टीका संरक्षणमंत्री राजनाथसिंह यांनी सोमवारी केली. अंतराळवीर शुभांशू शुक्ला यांच्या आंतरराष्ट्रीय अवकाश स्थानकावरील प्रवासावर चर्चेदरम्यान गोंधळ घातल्याबद्दल संरक्षणमंत्र्यांनी विरोधकांना सुनावले. विरोधकांच्या गोंधळामुळे लोकसभेचे कामकाज स्थगित करावे लागले. शुक्ला यांच्या उपलब्धीवर चर्चेदरम्यान विरोधकांनी बिहारमधील 'एसआयआर'च्या मुद्द्यावर सभागृहात जोरदार विरोध केला. त्यामुळे शुक्ला यांच्यावरील चर्चा कुठल्याही निर्णयाप्रत पोहोचली नाही.

# वरण भात म्हणजे गरिबांचं जेवण



आपल्या सिनेमांमुळे कायमच चर्चेत राहणारे विवेक अग्निहोत्री अनेकदा त्यांच्या वक्तव्यांमुळेही येत असतात. अशातच त्यांनी केलेल्या एका वक्तव्यामुळे नव्या वादाला तोंड फुटलं आहे, ते म्हणजे विवेक अग्निहोत्री यांनी नुकत्याच एका मुलाखतीत मराठी जेवण म्हणजे गरिबांचं जेवण असल्याचं म्हटलं. यावरून सोशल मीडियावर त्यांच्यावर टीकेची झोड उठली आहे. अशातच एका मराठी अभिनेत्रीनेही त्यांच्या या वक्तव्यावर पोस्ट शेअर केली आहे. 'बिग बॉस मराठी' फेम अभिनेत्री नेहा शितोळेने लांबलचक पोस्ट शेअर करत तिची प्रतिक्रिया व्यक्त केली आहे. विवेक अग्निहोत्री आणि पल्लवी जोशी यांचा व्हिडीओ शेअर करत कॅप्शनमध्ये तिने संताप व्यक्त केला आहे. या पोस्टमध्ये नेहा काही मुद्दे उपस्थित करत म्हणते, "मराठी जेवणाविषयी पर्यायाने संस्कृतीविषयी वाट्टेल ते बोलतोय हा माणूस... पुढे अजुन एका रीलमध्ये हा म्हणतोय की, मी सात्विक अन्न खातो... (याला सावजी खायला घाला आणि एकदा तांबडा-पांढरा रस्सा पाजा.) 'गरिबांचं' किंवा 'किसानांचं' जेवण म्हणजे वाईट असं म्हणून अन्नाचा, शेतकऱ्यांचा आणि भारताच्या जवळजवळ २५% जनतेचा, जी दारिद्र्य रेषेखाली राहतात; त्यांचा अपमान करतो आहे." यानंतर नेहा म्हणते, "आपल्या सगळ्यांची लाडकी पल्लवी जोशी हसून हसून हा विनोद अभिमानाने सांगते आहे आणि मुळात आम्ही भाज्या फक्त उकडत नाही, उकडीचे मोदक सोपे नाहीत किंवा पुरणपोळीही सोपी नाही. ज्यांच्या घरी असं जेवण जेवतात, अश्या मुलीशी कसं लग्न करायचं? हा विवेक अग्निहोत्रीला पडलेला प्रश्न आहे आणि हे सगळं युट्यूबच्या माध्यमातून करोडो लोक बघत आहेत." यानंतर नेहाने म्हटलंय, "हा माणूस काश्मीरचं सत्य आपल्या समोर आणतो आहे; म्हणून आपण याला डोक्यावर घ्यायचं? ज्या माणसाच्या भारतातल्या एका राज्याबद्दल, तिथे राहणाऱ्या आणि कष्ट करून कमावून खाणाऱ्या लोकांबद्दल मनात इतका भेदभाव आणि चुकीच्या धारणा आहेत.

# राधिका पहिल्यांदाच नेपोटिझमवर बोलली!

अभिनेत्री राधिका आपटे हिची वेगळी ओळख सांगायची गरज नाही. तिने तिच्या अभिनय कौशल्यानं मनोरंजन विश्वात वेगळीच ओळख निर्माण केली आहे. राधिका आपटे कायमच चर्चेत असते. राधिका ही नेहमी नवनवीन भूमिका, धाडसी प्रयोग आणि तिच्या बोल्ड अभिनयासाठी ओळखली जाते. अभिनेत्री राधिका आपटेचे अनेकदा तिच्या निःपक्षपाती मतांसाठी कौतुक केले जाते. कामांबरोबरच ती तिच्या वक्तव्यामुळे देखील चर्चेत असते. ती प्रचंड स्पष्टव्यक्ती आहे. ती कोणत्याही मुद्यावर तिचं स्पष्ट मत व्यक्त करत असते. आता राधिकाने नुकतिच एक मुलाखत दिली आहे. या मुलाखतीत तिने नेपोटिझमबद्दल आणि चित्रपट निर्मात्यांबद्दल काही स्पष्ट मत सांगितलं.यावर राधिका म्हणाली की, ज्या अभिनेत्यांना चांगलं काम करायचं आहे, त्यांना सगळ्यात आधी व्यायाम करून शरीर तयार करावं लागतं. यानंतर, त्यांना चांगले कपडे घालण्यापासून ते पापाराझी कॅमेऱ्यात येण्यापर्यंत सर्व गोष्टींकडे बारकाईने लक्ष द्यावे लागेल." पुढे ती म्हणते की, "मात्र स्टार किड्स कोणताही कोर्स किंवा कोचिंग करत नाहीत, कारण त्यांच्यासाठी ते महत्त्वाचे नसते. त्यांना वाटतं की आपण स्टार किड्स आहोत, आपल्याला सर्व काही येतं." "तर दुसरीकडे तो स्टार किड आहे, तो अभिनय करणारचं. जर नसेल करता येत तर आपण करुन घेवू असं चित्रपट निर्मात्यांनाही वाटतं. मला निर्मात्यांचे हे दोन चेहरे पाहिल्यानंतर खुप राग येतो. एकीकडे तुम्ही म्हणता की तुम्ही अभिनय करवून घेणार हा विश्वास तुम्हाला असतो मात्र जेव्हा चित्रपट फ्लॉप होतो तेव्हा तुम्ही कलाकाराला दोषी ठरवतात. वर्क फ्रंटवर बद्दल बोलायचं झालं तर, राधिकाने अनेक प्रकारच्या चित्रपटांमध्ये वेगवेगळ्या भूमिका साकारल्या आहेत. राधिकाने आजवर 'बदलापूर', 'हंटर', 'पॅड मॅन', 'पारचड', 'लस्ट स्टोरीज', 'माझी' यासारखे अनेक दर्जेदार चित्रपट केले आहेत. काही दिवसांपूर्वी ती अनुश्री मेहताच्या स्पाय कॉमेडी मिसेस अंडरकव्हरमध्ये दिसली होती. त्यानंतर ती मेड इन हेवनच्या दुसऱ्या सिझनमध्ये दिसली. आता ती मर्डर मिस्ट्री चित्रपटात दिसणार आहे



# कोकण हार्टेड गर्ल मनसेत?

कलाकारांचा राजकारणाकडे कल वाढला आहे. गेल्या काही महिन्यांपासून अनेक मराठी कलाकारांनी राजकीय पक्षात प्रवेश केला आहे. त्यात कालच अभिनेता अभिजीत केळकर याने देखील भाजपात प्रवेश केला. आता त्यातच आणखी एका कलाकाराने राजकारणात येण्याबद्दल हिंट दिली आहे. ती कलाकार म्हणजे अंकिता वालावलकर अंकिता वालावलकर ही कोकण हार्टेड गर्ल म्हणून प्रसिद्ध आहे. अंकिताचे फोटो आणि व्हिडिओ सोशल मीडियावर चर्चेत असतात. अंकिता यु ट्यूबर सुद्धा सक्रिय असते. अंकिताचे व्हिडिओ चाहत्यांच्या पसंतीस उतरत असतात.तिने केवळ रील स्टार म्हणून लोकप्रियता मिळवलेली नाही तर तिने तिच्या बऱ्याच व्हिडिओतून सामाजासाठी काही तरी करण्याचा प्रयत्न देखील करत असते. तिचे असे अनेक व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल होत असतात.अशातच आता अंकिता देखील राजकारणात येण्याचा विचार करतेय असं तिच्या वक्तव्यावरुन दिसतयं. अंकिता वालावलकरने नुकतीच सकाळला मुलाखत दिली. या मुलाखतीत तिला तिच्या राजकारणातील एंट्री बद्दल प्रश्न विचारण्यात आला होता. त्यावेळी तिने दिलेल्या उत्तराने सर्वांचे लक्ष वेधले आहे. ती म्हणाली, "पहिल्यापासून राजकारणातलं एक व्यक्तिमत्व म्हणजे बाळासाहेब ठाकरे मला फार आवडायचे. त्यानंतर राज ठाकरे हे व्यक्तीमत्व आवडायचं कल असं नाही म्हणता येणार पण आपल्याला कळत ना कोण चांगलं काम करत आणि स्पष्ट बोलतयं मी पहिल्यांदा त्यांच्या घरी गेले त्यामुळे त्यांच्या पक्षाशी जास्त संबंध आला.

# सिंधुताईंच्या मुलीची भावनिक पोस्ट

ज्येष्ठ अभिनेत्री ज्योती चांदेकर यांच्या निधनानंतर संपूर्ण मराठी कलाविश्वावर शोककळा पसरली आहे. ५३ वर्षांच्या कारकिर्दीत अनेक गाजलेल्या मालिका व चित्रपटांमध्ये त्यांनी विविधांगी भूमिका साकारुन सर्वांचं मन जिंकून घेतलं. या सगळ्यात ज्योती चांदेकरांनी साकारलेली सिंधुताई सपकाळ यांची व्यक्तिरेखा प्रेक्षकांच्या मनात एक वेगळं स्थान निर्माण करून गेली. २०१० मध्ये प्रदर्शित झालेल्या या सिनेमादरम्यान, ज्योती चांदेकर व त्यांची मुलगी प्रसिद्ध अभिनेत्री तेजस्विनी पंडित यांनी एकत्र काम केलं होतं. दरम्यान, सिंधुताई सपकाळ यांच्या कन्या ममता सिंधुताई सपकाळ यांनी सोशल मीडियावर भावनिक पोस्ट शेअर करत ज्योती चांदेकरांना अखेरचा निरोप दिला आहे. दरम्यान, ज्योती चांदेकर गेल्या अडीच वर्षांपासून स्टार प्रवाहच्या 'ठरलं तर मग' मालिकेत पूर्णा आजीची भूमिका साकारत होत्या.

# शिवानीने नऊवारी साडी नेसून केला ॲक्शन सीन



लोकप्रिय अभिनेत्री शिवानी सोनार 'झी मराठी'च्या 'तारिणी' मालिकेत मुख्य भूमिका साकारत आहे. तारिणी बेलसरे ही मुंबईत राहणारी अंडरकव्हर कॉप आहे जी आपल्या आईचं सत्य शोधून काढण्यासाठी आणि खऱ्या गुन्हेगाराला जगापुढे आणण्यासाठी पोलिसांत भरती होते. ही मालिका ११ ऑगस्टला सुरू झाली. नुकत्याच दिलेल्या मुलाखतीत 'तारिणी'बद्दलच्या काही गोष्टी शिवानी सोनारने शेअर केल्या आहेत. अभिनेत्री म्हणते, "तारिणीला अल्पावधीतच इतकं प्रेम दिल्याबद्दल प्रेक्षकांचे आभार... तारिणीच्या प्रोमो शूटसाठी आम्ही पहिल्या दिवसापासून ॲक्शन सीन शूट करत आहोत. यावेळी मी नऊवारी साडी नेसून ॲक्शन सीन शूट केला. खरंतर, अशाप्रकारे शूट करणं हे माझ्यासाठी खूप आव्हानात्मक होतं. आम्ही सर्वांनी खूप मेहनत घेतली आणि तो प्रोमो पूर्ण केला." "मात्र, प्रोमो शूटच्या रात्री मी ॲक्शन सीन करताना धडपडले. त्या ॲक्शन सीनमध्ये मला गुंडाला लाथ मारायची असते असा सीन होता आणि त्यानंतर धावायचं होतं. पण, या दरम्यान धावताना माझा बूट अडकला आणि मी पडले. त्यामुळे माझ्या उजव्या खांद्याला दुखापत झाली होती. अजूनही तो खांदा रिकव्हर होत आहे. आता अशाप्रकारच्या सगळ्या सीन्ससाठी मी माझ्या मनाची तयारी केली आहे. कारण, आमच्या मालिकेचं नावच 'तारिणी' आहे. त्यामुळे ॲक्शन सीन हे वारंवार करावे लागणारच... आपण कितीही काळजी घेतली आणि सतर्कता पाळली तरीही ॲक्शन म्हटलं की लागणं-पडणं या गोष्टी होतात." शिवानी सोनार पुढे सांगते, "मला या भूमिकेसाठी प्रोडक्शन हाऊसमधून कॉल आला होता. 'झी मराठी' एक मालिका करत आहे तर, तुला ऑडिशन द्यायला आवडेल का आणि त्यानंतर मी ऑडिशन दिली. मग मालिकेच्या हिरोच्या भूमिकेसाठी ऑडिशन सुरू होत्या.

आशिया चषक

## गिलबाबत संभ्रम, आशिया चषकासाठी आज संघनिवड

# कोणत्या जागेसाठी कोण दावेदार?

| नवी दिल्ली |
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**आगामी आशिया चषक ट्वेन्टी-२० क्रिकेट स्पर्धेसाठी भारतीय संघाची आज, मंगळवारी निवड केली जाणार असून कसोटी कर्णधार शुभमन गिल आणि अनुभवी फलंदाज श्रेयस अय्यर यांच्याबाबत काय निर्णय घेतला जातो, याकडे सर्वांचे लक्ष असेल. केवळ १५ स्थानांसाठी जवळपास ३० खेळाडूंचे पर्याय उपलब्ध असल्याने संघनिवड करताना अजित आगरकर यांच्या समितीचीच कसोटी लागणार आहे. पुढील वर्षी भारत आणि श्रीलंकेत ट्वेन्टी-२० विश्वचषक होणार असून संघबांधणीच्या दृष्टीने आशिया चषक स्पर्धा निर्णायक ठरू शकेल.**

## श्रेयसबाबतच्या निर्णयाकडेही लक्ष




आशिया चषक स्पर्धा ९ ते २८ सप्टेंबर या कालावधीत संयुक्त अरब अमिराती येथे रंगणार आहे. भारतीय संघाने गतवर्षी ट्वेन्टी-२० विश्वचषक स्पर्धा जिंकल्यानंतर रोहित शर्मा, विराट कोहली आणि रवींद्र जडेजा या तारांकितांनी क्रिकेटच्या लघुत्तम प्रारूपातून निवृत्ती घेतली. त्यानंतर नेतृत्वाची धुरा सूर्यकुमार यादवकडे सोपविण्यात आली आणि अभिषेक शर्मा, तिलक वर्मा, संजू सॅमसन यांसारख्या नव्या दमाच्या खेळाडूंना संधी देण्यात आली.या खेळाडूंनी संधीचे सोने केल्याने भारताने इंग्लंड, दक्षिण आफ्रिका आणि बांगलादेश यांसारख्या संघांविरुद्धच्या ट्वेन्टी-२० मालिकेत यश मिळवले. त्यामुळे आता आशिया चषकासाठीही याच खेळाडूंवर विश्वास दाखवायचा की 'आयपीएल', तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर कसोटी, एकदिवसीय क्रिकेटमध्ये यशस्वी ठरत असलेल्या शुभमन गिल, श्रेयस अय्यर आणि यशस्वी जैस्वाल यांसारख्या खेळाडूंना संघात समाविष्ट करायचे, हा अवघड निर्णय निवड समितीला घ्यावा लागणार आहे.श्रेयस जवळपास दोन वर्षांपासून ट्वेन्टी-२० संघातून बाहेर आहे, तर गिलने अखेरचा आंतरराष्ट्रीय ट्वेन्टी-२० सामना गेल्या वर्षी जुलैमध्ये खेळला होता. मात्र, या वर्षीच्या 'आयपीएल'मध्ये या दोघांनीही धावांचा रतीब उभारला. सर्वाधिक धावा करणाऱ्या फलंदाजांमध्ये गिल (१५ सामन्यांत ६५०) आणि श्रेयस (१७ सामन्यांत ६०४) अनुक्रमे चौथ्या आणि सहाव्या स्थानावर होते. तसेच काही महिन्यांपूर्वी अमिराती येथेच झालेल्या चॅम्पियन्स करंडक एकदिवसीय स्पर्धेत श्रेयसने चमकदार कामगिरी केली होती.

### ३० खेळाडूंचे पर्याय उपलब्ध

आशिया चषक स्पर्धा ९ ते २८ सप्टेंबर या कालावधीत संयुक्त अरब अमिराती येथे रंगणार आहे. धुरा सूर्यकुमार यादवकडे सोपविण्यात आली आणि अभिषेक शर्मा, तिलक वर्मा, संजू सॅमसन यांसारख्या नव्या दमाच्या खेळाडूंना संधी देण्यात आली.या खेळाडूंनी संधीचे सोने केल्याने भारताने इंग्लंड, दक्षिण आफ्रिका आणि बांगलादेश यांसारख्या संघांविरुद्धच्या ट्वेन्टी-२० मालिकेत यश मिळवले.

दुसरीकडे, गिलने नुकत्याच झालेल्या इंग्लंडविरुद्धच्या कसोटी मालिकेत अनेक विक्रम रचले. त्यामुळे आता ट्वेन्टी-२० संघासाठीही या दोघांचा विचार करणे निवड समितीला भाग पडले आहे.अमिराती येथील संथ खेळपट्ट्यांचा विचार करता निवड समिती फिरकीपटूंना प्राधान्य देणे अपेक्षित आहे. अक्षर पटेल आणि वरुण चक्रवर्ती यांचे स्थान निश्चित मानले जात असून कुलदीप यादव, रवी बिश्नोई आणि वॉशिंग्टन सुंदर यांच्यापैकी दोघांना संधी दिली जाऊ शकेल. तारांकित वेगवान गोलंदाज जसप्रीत बुमराने आपली उपलब्धता कळवल्याने त्याची निवडही अपेक्षित आहे. इंग्लंडविरुद्धच्या कसोटी मालिकेत उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या मोहम्मद सिराजला संधी मिळते का, हे पाहणेही महत्त्वाचे ठरेल. सूत्रांच्या म्हणण्यानुसार, गिलच्या तुलनेत श्रेयसच्या पुनरागमनाची शक्यता अधिक आहे. आशिया चषकासाठी गिलला संघात स्थान दिले, तर त्याला अंतिम ११ मध्ये घ्यावेच लागेल. त्याला मैदानाबाहेर बसवून ठेवणे योग्य ठरणार नाही, अशी संघ व्यवस्थापन आणि निवड समितीची धारणा आहे. त्यातच आशिया चषक स्पर्धा २८ सप्टेंबरला संपणार असून भारतीय संघ मायदेशात २ ऑक्टोबरपासून वेस्ट इंडिजविरुद्ध कसोटी मालिका खेळणार आहे. त्यामुळे आशिया चषकात खेळल्यास गिलला विश्रांती करण्यासाठी पुरेसा वेळ मिळू शकणार नाही. श्रेयस सध्या कसोटी संघाचा भाग नसल्याने त्याला ट्वेन्टी-२० संघात प्राधान्य मिळू शकेल.

## नामांकित खेळाडूंच्या सहभागाचे आकर्षण

# अमेरिकन टेनिस स्पर्धेच्या मिश्र दुहेरी लढती आजपासून

| नवी दिल्ली |
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**वर्षातील अखेरची ग्रँडस्लॅम टेनिस स्पर्धा अशी ख्याती असलेल्या अमेरिकन खुल्या स्पर्धेने या वर्षीपासून नवा पायंडा पाडला असून, एकेरीच्या स्पर्धेच्या जवळपास आठवडाभराआधीच मिश्र दुहेरीच्या लढतींना सुरुवात होणार आहे. मिश्र दुहेरीच्या दोनदिवसीय स्पर्धेला आज, मंगळवारपासून सुरुवात होणार असून यात नामांकित खेळाडूंच्या सहभागाचे आकर्षण असेल.**



या स्पर्धेत आठ जोड्यांना थेट प्रवेश देण्यात आला आहे. यात पुरुष एकेरीतील अग्रमानांकित यानिक सिन्नेर आणि कॅटेरिना सिनियाकोवा यांचाही समावेश आहे. कार्लोस अल्कराझ एमा रॅडुकानुसह खेळणार असून, पहिल्या फेरीत त्यांची गाठ अग्रमानांकित जेसिका पेगुला आणि जॅक ड्रॅपर या जोडीशी पडणार आहे. त्याच वेळी सिन्नेर-सिनियाकोवा पहिल्या फेरीत ॲलेक्झांडर झ्वेरेव आणि बेलिंडा बेंचिच जोडीविरुद्ध खेळणार आहे. नोव्हाक जोकोविच आणि ओल्गा डॅनिलोविच जोडीसमोर डॅनिल मेदवेदेव आणि मीरा आंद्रिवा जोडीचे आव्हान असेल.एकेरीतील बहुतेक आघाडीचे खेळाडू या वेळी मिश्र दुहेरीत खेळणार आहेत. अमेरिकन स्पर्धेतील दोन वेळची विजेती नाओमी ओसाकला गेल मॉंफिस, कॅरोलिना मुचोवाला आंद्रे रुब्लेव आणि लॉरेन्झो मुसेट्टीला केटी मॅकनॅलीची साथ लाभेल. मुसेट्टी जॅस्मिना पाओलिनीच्या साथीत खेळणार होता. मात्र, ती सिनसिनाटी स्पर्धेत अंतिम फेरीपर्यंत पोहोचल्याने तिने अमेरिकन स्पर्धेच्या मिश्र दुहेरीतून माघार घेतली. इगा श्वीऑटेक कॅस्पर रुडच्या साथीत खेळणार आहे. मिश्र दुहेरीतल गतविजेती सारा एरानी आणि आंद्रेया वावासोरी जोडीही स्पर्धेत सहभाग नोंदवेल.

### स्पर्धेत आठ जोड्यांना थेट प्रवेश

या स्पर्धेत आठ जोड्यांना थेट प्रवेश देण्यात आला आहे. यात पुरुष एकेरीतील अग्रमानांकित यानिक सिन्नेर आणि कॅटेरिना सिनियाकोवा यांचाही समावेश आहे. पहिल्या फेरीत त्यांची गाठ अग्रमानांकित जेसिका पेगुला आणि जॅक ड्रॅपर या जोडीशी पडणार आहे. त्याच वेळी सिन्नेर-सिनियाकोवा पहिल्या फेरीत ॲलेक्झांडर झ्वेरेव आणि बेलिंडा बेंचिच जोडीविरुद्ध खेळणार आहे.

स्मार्ट PCMC SMART CITY
महाईन्यूज ™
ePaper
epaper.mahaenews.com
। मंगळवार ।
। दि. 19 ऑगस्ट 2025।
पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

## सिंधुदुर्ग जिल्हा उत्कर्ष मंडळाचा 47 वा वार्षिक

# देशभक्तीच्या वातावरणात विद्यार्थी भारावले !

## शिक्षण विश्व: एस.पी.जी. स्कूलमध्ये स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा



। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**एस.पी.जी. इंटरनॅशनल पब्लिक स्कूल आणि ज्युनिअर कॉलेज, सेक्टर क्र. २०३, आळंदी रोड, भोसरी येथे भारताचा ७९ वा स्वातंत्र्यदिन देशभक्तीच्या उत्साहात साजरा करण्यात आला.**

कार्यक्रमाची सुरुवात सकाळी ७ वाजता ध्वजारोहणाने झाली. प्रमुख पाहुणे म्हणून पांडुरंग गवळी, नितीन लोणारी, सुनिता गवळी, स्वप्नील गवळी, तसेच विद्यालयाचे मुख्याध्यापक डॉ. प्रवीण गायकवाड यांच्या उपस्थितीत ध्वजवंदन करण्यात आले. यावेळी शिक्षकवृंद, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थ्यांची मोठी उपस्थिती होती.

ध्वजारोहणानंतर पांडुरंग गवळी यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणातून स्वातंत्र्यलढ्यातील थोर नेत्यांचे स्मरण करत विद्यार्थ्यांमध्ये देशप्रेम जागवणारे विचार मांडले.

यानंतर शालेय विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गीते, नृत्य, भाषण आदी सांस्कृतिक कार्यक्रम सादर करून वातावरण राष्ट्रभक्तीने भारावून टाकले. तसेच सन २०२४-२५ मधील दहावी व





बारावीच्या गुणवंत विद्यार्थ्यांचा शाल, श्रीफळ व प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात आला.

कार्यक्रमाच्या समारोपानंतर सर्व उपस्थितांना मिष्टान्नाचे वाटप करण्यात आले. संपूर्ण कार्यक्रम अत्यंत शिस्तबद्ध व प्रेरणादायी वातावरणात पार पडला.

---

## स्वातंत्र्य दिनाच्या उत्सवात दिसला देशभक्तीचा रंग

## शिक्षण विश्व : कासारवाडी परिसरात स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा

। पिंपरी चिंचवड।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**देशभरात अभिमानाने आणि उत्साहाने साजरा होत असताना, कासारवाडी परिसरातील विविध शैक्षणिक आणि सामाजिक संस्थांमध्ये ध्वजारोहण समारंभाचे आयोजन करण्यात आले. .**

यावेळी सामाजिक कार्यकर्त्या प्रतिभा जवळकर यांनी उर्दू स्कूल, सिद्धी विनायक मंदिर, डी एम के इंटरनॅशनल स्कूल, विकास शील सोसायटी, तसेच ज्येष्ठ नागरिक संघ, कासारवाडी येथे ध्वजारोहण समारंभाला उपस्थित राहून तिरंग्याला अभिमानाने वंदन केले.

या वेळी विद्यार्थी, शिक्षक, नागरिक आणि ज्येष्ठ नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. प्रत्येक ठिकाणी राष्ट्रगीताचे सामूहिक गायन, देशभक्तिपर गीतांची गाणी आणि विद्यार्थ्यांच्या जोशपूर्ण भाषणांनी वातावरण भारावून गेले होते. यावेळी देशासाठी बलिदान देणाऱ्या वीरांना आदरांजली वाहून त्यांच्या कार्याचे स्मरण करण्यात आले.

> “स्वातंत्र्याचा खरा अर्थ समजून घेणे आणि देशासाठी जबाबदार नागरिक म्हणून योगदान देणे ही आपल्या सर्वांची नैतिक जबाबदारी आहे. आजचा दिवस देशभक्तीच्या रंगांनी आणि आनंदाच्या उत्साहाने भारलेला आहे.




Pune District Education Association's
Seth Govind Raghunath Sable
College of Pharmacy
Saswad, Pune - 412301
D.Pharm/B.Pharm/M.Pharm/Ph.D.
PDEA
Pharmacy Council of India
SPPU Affiliation
NAAC Accreditation
Maharashtra State Board of Technical Education
Facilitation & Verification Center for
F. Y. B.Pharm, F.Y.M.Pharm,and
Direct S.Y.B.Pharm Admission 2025–26
Admission Schedule for
F.Y.B.Pharm
Online Registration & Document Upload
07 – 21July 2025 (10:00AM-5:00PM)
Document Verification & Form Confirmation (Physical Scrutiny at FC)
08 – 22 July 2025 (10:00AM-5:00 PM)
Display of Provisional Merit List
25 July 2025
Grievance Submission (Online / at FC)
26– 28 July 2025 (10:00AM-5:00 PM)
Final Merit List
31 July 2025
Your Trusted Facilitation Centre!
FC Code 6372
Important Note:
• Bring all original + Xerox copies of documents
• Late registrations after 14 July are for Non-CAP seats only
"Your First Step Towards a Bright Pharmacy Career!"
Confirm Your Application Now!
Visit Us for Physical Scrutiny
PDEA's Seth Govind Raghunath Sable College of Pharmacy, Saswad
Timings: 10:00 AM – 5:00 PM (including Saturday & Sunday)
Contact: Dr. Nilesh Bhosale – 9860503549

# ‘डीबीटी’च्या माध्यमातून विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप!

## अतिरिक्त आयुक्तांनी शाळांना अचानक भेट देत केली शालेय साहित्याची तपासणी

। पिंपरी चिंचवड ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**पिंपरी चिंचवड महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील यांनी आज सकाळी अचानक महापालिकेच्या चऱ्होली बु. येथील पंडित जवाहरलाल नेहरू प्राथमिक शाळेला भेट दिली. यावेळी त्यांनी बाकावर बसून विद्यार्थ्यांशी संवाद साधला. तसेच थेट लाभ हस्तांतरण म्हणजेच डीबीटी उपक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना वाटप करण्यात आलेल्या शालेय साहित्याची तपासणी केली. यंदाच्या वर्षी मिळालेले साहित्य कसे वाटते, याबाबत विद्यार्थ्यांच्या प्रतिक्रियाही त्यांनी जाणून घेतल्या.**



> विद्यार्थ्यांना ‘डीबीटी’च्या माध्यमातून देण्यात येणाऱ्या शैक्षणिक साहित्याचा दर्जा तपासणे व विद्यार्थ्यांच्या या साहित्याबाबत प्रतिक्रिया जाणून घेण्यासाठी आज चऱ्होली बु. येथील पंडित जवाहरलाल नेहरू प्राथमिक शाळेला भेट दिली होती. तसेच महापालिकेच्या शिक्षण विभागाच्या विद्यार्थ्यांसाठी असणाऱ्या योजनांचा त्यांना फायदा कितीपत होत आहे? भारत दर्शन सारख्या उपक्रमांची विद्यार्थ्यांना माहिती आहे का? हे जाणून घेण्याचा उद्देशही या भेटीमागे होता. आगामी काळामध्येही अशा प्रकारे अचानक शाळांना भेट देऊन तपासणी सुरू राहतील.
>
> **- प्रदीप जांभळे पाटील,**
> अतिरिक्त आयुक्त, पिंपरी चिंचवड महापालिका

पिंपरी चिंचवड महापालिकेने विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटपासाठी डीबीटी उपक्रम सुरू केला आहे. महापालिकेच्या १४६ शाळांमधील विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचा थेट लाभ मिळावा, या उद्देशातून सुरू करण्यात आलेल्या या उपक्रमातून सर्व विद्यार्थ्यांना शालेय साहित्य किट मिळाले आहे का, याची तपासणी आता शिक्षण विभागाने सुरू केली आहे. त्या अनुषंगाने अतिरिक्त आयुक्त जांभळे पाटील यांनी थेट आज चऱ्होली बु. येथील शाळेला अचानक भेट देत तपासणी केली. तसेच विद्यार्थ्यांसोबत संवाद साधत त्यांच्याकडून शैक्षणिक साहित्याचा दर्जा कसा आहे, हे देखील जाणून घेतले.

चऱ्होली बु. शाळेतील जवळपास ९० टक्के विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे कीट मिळाले असल्याचे निर्देशनास आले. तर उर्वरीत विद्यार्थ्यांना अद्याप कीट का मिळाले नाही, याबाबत अतिरिक्त आयुक्त जांभळे पाटील यांनी माहिती घेतली. त्यानंतर तातडीने शैक्षणिक साहित्याचे कीट मागवून घेत विद्यार्थ्यांना वाटप केले. यावेळी सदर शैक्षणिक कीट स्वतःच्या हाताने फोडून त्यामध्ये असणाऱ्या साहित्याची तपासणी जांभळे पाटील यांनी केली. यावेळी काही विद्यार्थ्यांना गणवेश व शूज मिळाले नसल्याचे लक्षात आल्यानंतर जांभळे पाटील यांनी विद्यार्थ्यांना दोन दिवसाच्या आत गणवेश व शूज देण्याचे निर्देश संबंधित अधिकाऱ्यांना दिले. तसेच विद्यार्थ्यांना देण्यात आलेल्या शैक्षणिक साहित्याचा पुरेपूर वापर होईल, याची काळजी घेण्याच्या सूचनाही शाळेच्या शिक्षकांना दिल्या.

### शालेय पोषण आहाराची घेतली माहिती

विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या शालेय पोषण आहाराच्या गुणवत्तेबाबत देखील अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील यांनी माहिती घेतली. तसेच पोषण आहाराची गुणवत्ता आणि प्रमाण तपासण्यासाठी तो स्वतः खाऊन पाहिला. विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या आहाराची गुणवत्ता ही उत्तमच असावी. त्याची वेळोवेळी शाळेतील मुख्याध्यापक, शिक्षक यांनी तपासणी करावी. त्यामध्ये कुठलाही हलगर्जीपणा करू नका, असे निर्देशही त्यांनी दिले.




EDUCATING MIND & HEART
Priyadarshani
SCHOOL & JR. COLLEGE
ALANDI
PRIYADARSHANI GROUP OF SCHOOLS
42 Years of Excellence in Education
ADMISSIONS OPEN
FOR AY 2025-26
Holistic
Empowering
Learning
IT ALL STARTS HERE
42
YEARS OF ENRICHING EXPERIENCE OF EDUCATION
55+
NATIONAL & INTERNATIONAL AWARDS ACROSS OUR SCHOOLS
11+
CAMPUSES IN AND AROUND PUNE, MAHARASHTRA
17K+
17,000 STUDENTS ACROSS CAMPUSES
600+
TEACHING AND NON TEACHING STAFF
13K+
13,000 ALUMNI ACROSS GLOBE
PRIYADARSHANI GROUP OF SCHOOLS
BHOSARI | INDRAYANI NAGAR | MOSHI | CHAKAN | ALANDI | SHIVAJINAGAR | NANEKARWADI | WANOWRIE | SATARA
+91 8668755826
alandi@priyadarshanischools.org
www.priyadarshanischools.org